## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये आदेश

३२९० जा.क्र.वि३/कर्मा को.ऑप.ही.सो./प्रा.अ.नि./आ/१७
उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक तालुका
नाशिक यांचे कार्यालय, सहकार संकुल, नॅशनल
ऊर्दू हायस्कूल जवळ, सारडा सर्कल, नाशिक.
दिनांक १८/०९/२०१७

वाचावे :- १) चेअरमन, कर्मा को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.नाशिक यांचे दिनांक ३१/०५/२०१७ चे पत्र व त्यासोबतचे समिती सदस्यांचे राजीनामे
२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) (१) (१-अ) (ब-१) मधील तरतुद.
३) या कार्यालयाची नोटीस दि.६/७/२०१७ व सुनावणी कामकाज दि.०६/९/२०१७,१६/९/२०१७.

ज्याअर्थी, कर्मा को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.नाशिक ता.जि.नाशिक ही संस्था (जिचा उल्लेख यापुढे 'संस्था' असा केला आहे) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम १९६१ अन्वये (ज्याचा उल्लेख या पुढे 'अधिनियम' व 'नियम' असा केला आहे) नोंदविण्यात आलेली सहकारी संस्था आहे. संस्था व्यवस्थापनाने संस्थेचे कामकाज अधिनियम, नियम व मंजुर उपविधीतील तरतुदी नुसार चालविणे बंधनकारक आहे.

२/- ज्याअर्थी, उक्त वाचावे क्रमांक ०१ अन्वये या कार्यालयाचे असे निदर्शनास आणून दिलेले आहे की, संस्थेचे चेअरमन, सेक्रेटरी तसेच १० समिती सदस्यांपैकी ७ समिती सदस्यांनी राजीनामे दिलेला असल्याने समिती कार्यरत राहिलेले नसुन संस्थेच्या समितीने कार्य करण्याचे बंद केले आहे व व्यवस्थापना मध्ये पोकळी निर्माण झाली आहे, अशी या कार्यालयाची धारणा झालेली आहे. आणि सदर बाबी वरुन संस्थेचे कामकाज अधिनियम, नियम, व उपविधीतील तरतुदी नुसार सुरु नसल्याचे आणि संस्थेच्या समितीने कार्य करण्याचे बंद केले आहे व व्यवस्थापना मध्ये पोकळी निर्माण झालेली असल्याचे सकृतदर्शनी दिसुन आल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) (१) (१-अ) (ब-१) मधील तरतुद प्रस्तुत संस्थेच्या बाबतीत प्रभावीत होत असल्याने, नमुद संस्थेचे कामकाज चालविण्यासाठी प्राधिकृत अधिकारी नियुक्त करणे आवश्यक आहे.

७/- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) (१) (१-अ) (ब-१) मधील तरतुदी नुसार, संस्थेच्या समितीने कार्य करण्याचे बंद केले आहे व व्यवस्थापना मध्ये पोकळी निर्माण झाली आहे, अशा परिस्थितीत संस्थेचा कारभार चालविण्यासाठी प्राधिकृत अधिकाऱ्यांची नियुक्त करण्याची तरतुद आहे. सदर तरतुद नमुद संस्थेच्या बाबतीत प्रभावीत होत असल्याने, नमुद संस्थेचे कामकाज चालविण्यासाठी प्राधिकृत अधिकारी नियुक्त करणे व प्राधिकृत अधिकाऱ्या करवी संस्थेची नविन समिती गठीत करणे संस्थेच्या व सभासदाच्या हिताचे होईल, अशी या कार्यालयाची धारणा झालेली आहे. तसेच सुनावणी कामकाज दि.६/९/२०१७,१६/९/२०१७ मध्ये उपस्थित संचालक यांनी स्वखुशीने राजिनामे दिले असल्याचे तोंडी म्हणणे सादर केलेले आहे व त्यांनी कामकाज करण्याचे बंद केलेले आहे.



Scanned by CamScanner

आदेश देत आहे.

**आदेश**

कर्मा को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.नाशिक ता.जि.नाशिक या संस्थेच्या समितीने कार्य करण्याचे बंद केले आहे व व्यवस्थापनामध्ये पोकळी निर्माण झाली असल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) मधील तरतुदींचा वापर करुन नमूद संस्थेचा कारभार चालविण्यासाठी या कार्यालयाच्या आस्थापनेवरील सहकार अधिकारी प्र.श्रे. श्री पी.आर.शिंपी यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नेमणूक करीत आहे.

प्राधिकृत अधिकाऱ्यांने संस्थेच्या समितीची निवडणूक प्रक्रिया पदभार स्विकारले पासुन सहा महिन्याच्या आंत राबविणे कामी मतदार यादी मुदतीत या कार्यालयाकडे सादर करण्याची कार्यवाही करावी.

सदरचा आदेश आज दिनांक १८/०९/२०१७ रोजी माझे सही व कार्यालयिन मुद्रेसह दिला असे.

DEPUTY REGISTRAR CO-OPERATIVE SOCIETY NASIK TALUKA NASIK

( संजय गिते )
उपनिबंधक
सहकारी संस्था, नाशिक तालुका, नाशिक.

दिनांक १८/०९/२०१७
ठिकाण नाशिक.

**प्रति,**

१) माजी चेअरमन / संचालक / सचिव, कर्मा को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.टाकळीरोड,नाशिक

२/- त्यांना सुचित करण्यात येते की, संस्थेचे दप्तर व व्यवस्थापन प्राधिकृत अधिकाऱ्याकडे चार्ज यादीसह सुपूर्द करुन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

२) श्री. पी.आर.शिंपी, प्राधिकृत अधिकारी, कर्मा को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.नाशिक

२/- त्यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी संस्थेच्या कामाकाजाचा पदभार स्विकारुन व सुचना प्रमाणे कार्यवाही करुन तसा अहवाल सादर करावा.

**प्रत माहितीस्तव :-**

१) शाखाधिकारी, नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. नाशिक शाखा:- व्दारका
२) शाखाधिकारी, स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा- शिवाजीनगर,ता.जि.नाशिक
३) कॉसमॉस बँक बनकर चौक शाखा नाशिक
४) आय.डी.बी.आय. शाखा - व्दारका

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :-**

१)मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक.
२)मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक.

उपनिबंधक
सहकारी संस्था, नाशिक तालुका, नाशिक.



Scanned by CamScanner